पुढारी

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि आत्मनिर्भर भारत

**A Youth without skills is like a bird without wings!**



**शिक्षण हा सर्वांगीण मानवी विकासाचा पाया आहे, पर्यायाने राष्ट्र विकासाचा पाया आहे. कोणत्याही देशातील मानवी संसाधनाच्या क्षमतांचा अत्युच्च विकास साधण्यासाठी शिक्षण ही प्रक्रिया फार महत्त्वाची आहे. आणि म्हणूनच शिक्षण प्रक्रिया कालसुसंगत असावी याचे भान धोरणकर्त्यांनी ठेवले पाहिजे.**

- प्रा. अरविंद कदम, उद्योजक, सातारा.



आपल्या देशात स्वातंत्र्योत्तर कालखंडात हे भान जागते ठेवून वेळोवेळी केंद्र सरकारने भारताच्या शिक्षण प्रणालीचे आधुनिकीकरण करण्यासाठी तसेच प्रस्ताव विकसित करण्यासाठी विविध आयोगांचे गठन केले आहे. यामध्ये विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८-१९४९), माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२-१९५३), विद्यापीठ अनुदान आयोग आणि कोठारी आयोग (१९६४-६६) ची स्थापना करुन त्याआधारे देशाच्या शैक्षणिक विकासाचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यामध्ये देशाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी तत्कालीन कोठारी आयोगाच्या शिफारशी लागू करून शिक्षण यंत्रणेत सुधारणा करण्यासाठी १९६८ मध्ये पहिले राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८ जाहीर केले. तदनंतर १९७७ मध्ये या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आढावा घेण्यासाठी समिती गठित करण्यात आली. तत्पूर्वी १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीने शिक्षण हा विषय राज्यवर्ती सूचीतून समवर्ती सूचीत टाकण्यात आला. स्वतंत्र भारताच्या या पहिल्याच शैक्षणिक धोरणात पुढील गोष्टींवर भर देण्यात आलेला दिसून येतो. त्यामध्ये मोफत व सक्तीचे शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, त्रिभाषा सूत्राचा वापर, शिक्षणाच्या समान संधी, प्रादेशिक असमतोल दूर करणे, शाळा व समाज यांना जवळ आणणे, विज्ञान व संशोधनाला महत्त्व, परीक्षांचा उद्देश शिक्षणाचा स्तर उंचावणे, प्रौढ साक्षरतेवर भर, अर्धवेळ तसेच पत्रद्वारा शिक्षणक्रमाचा विकास आणि शिक्षण संरचना १० + २ + ३ अशी करण्यात आलेली दिसते आणि पुढे ती दीर्घकाळ टिकून राहिलेली दिसते. तदनंतर १९८६ साली भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ ला जाहीर केले. या धोरणामध्ये १९६८ च्या धोरणातील बऱ्याचशा बाबी स्वीकारुन प्रामुख्याने पुढील काही नवीन गोष्टींची भर घालण्यात आली. त्यामध्ये १४ वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात रोखून धरणे, शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा करणे, माध्यमिक स्तरावर संगणक शिक्षण देण्यास सुरुवात करणे, शिक्षणातील विषमता दूर करणे, नवोदय विद्यालय सुरू करणे आणि मुक्त विद्यापीठांच्या स्थापनेस प्रोत्साहन देणे. या बाबींचा उल्लेख करता येईल. या शैक्षणिक धोरणाचा आढावा घेण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी १९९२ साली राष्ट्रीय शिक्षण धोरण कृती आराखडा पुढे आणला. या कृती आरावण्यात आल्या त्या म्हणजे शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा करणे आणि वय वर्षे १४ पर्यंत शिक्षणाच्या प्रवाहातून विद्यार्थी बाहेर पडणार नाही याची काळजी घेणे. त्यानंतर २००५ मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या किमान समान कृतिशील कार्यक्रमावर आधारित नवीन शैक्षणिक धोरण आखले गेले. त्यामध्ये व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणक्रमांसाठी देशभरात समान प्रवेश परीक्षा सुरू झाली. १८ ऑक्टोबर २००१ च्या भारत सरकारच्या जेईई, एआयईई (राष्ट्रस्तरीय) आणि एसएलईई या तीन परीक्षा योजना आखल्या गेल्या. पुढे 'बालकांच्या शिक्षण हक्काचा कायदा २००९' हा १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात आला. त्यामध्ये ६ ते १४ वयोगट असणाऱ्या मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यास सुरुवात झाली. अशाप्रकारे १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने शिक्षण व्यवस्थेला संगणक शिक्षणाच्या रूपाने तंत्रज्ञानाची जोड दिली. नवोदय विद्यालयाच्या रूपाने देशभरातील गुणवत्ताधारित मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. तसेच मुक्त विद्यापीठाची संकल्पना प्रत्यक्षात आणून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर गेलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले. याच काळात सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा होऊन प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले. मात्र याच कालखंडात शिक्षण क्षेत्रात काही अपप्रवृत्ती फोफावत गेल्यामुळे पदव्यांचे बाजारीकरण झाले. देशातील विद्यापीठे पदव्या देणारे कारखाने बनले आणि त्यामुळेच उच्च शिक्षणातील गुणवत्ता प्रश्नांकित झाली. तसेच उच्च शिक्षण आणि रोजगार क्षमता यामध्ये मोठ्या प्रमाणात फारकत झालेली दिसून आली. या सर्वाचा परिणाम म्हणून गेल्या काही वर्षात उच्च शिक्षणाच्या परिणामकारकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. पदवी आणि रोजगारक्षमता यांच्यात झालेल्या फारकतीमुळे उच्च शिक्षणाबद्दलची एक प्रकारची अनास्था समाजात निर्माण झाली. या १९६८ आणि १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमी २०१५ मध्ये केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री असणाऱ्या स्मृती इराणी यांनी ऑक्टोबर २०१६ मध्ये नव्या शैक्षणिक सुधारणेचे धोरण मांडले पण ते मंजूर होऊ शकले नाही. पुढे इस्रोचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी बनवून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० साठी पुन्हा दुसरा प्रयत्न करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP), २०२० ला मंजुरी दिली. तसेच मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय करण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून २०२२ पासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्यात आले आहे. या नवीन शैक्षणिक धोरणाचे ध्येय भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे असे आहे.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील काही लक्षणीय बाबी पुढीलप्रमाणे...**

शालेय शिक्षणातील गुंतवणुकीमध्ये लाक्षणिक वाढ करणे नवनवीन उपक्रम राबविणे. शालेय शिक्षणासाठी ५+३+३+४ रचनेवर आधारित बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्र रचना विकसित करण्यात आली आहे. इसवी सन २०२५ पर्यंत पाचवी व त्यापुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता व तंत्रज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता घेणे. इयत्ता ५ वी पर्यंतचे शिक्षण देण्यासाठी प्राधान्याने मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा वापरली जाईल या धोरणाच्या माध्यमातून सर्वच भारतीय भाषांचे संवर्धन वृद्धी व चैतन्य अबाधीत राहील. मातृभाषेतून शिक्षणावर भर राहील. उच्च शिक्षणाचे अभ्यासक्रम प्रादेशिक भाषेतून राबविण्यावर जास्त भर दिला जाईल आणि कोणत्याही विद्यार्थ्यावर कोणतीही भाषा कठोरपणे लादली जाणार नाही. या शैक्षणिक धोरणात भारतीय भाषा कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यात आले आहे. १० + २ ची सद्य शिक्षण प्रणाली नवीन व सुधारित ५ + ३ + ३ + ४ रचनेद्वारे अनुक्रमे ३-८, ८-११, ११-१४, आणि १४-१८ वयोगटात परस्पर बदलली जाईल. या प्रणालीमध्ये १२ वर्षांचे शिक्षण हे ३ वर्ष अंगणवाडी / पूर्व-शालेय शिक्षणासह असेल. दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा अधिक सुलभ केल्या जातील आणि तथ्ये शिकण्याऐवजी मुख्य कार्यक्षमतेवर अधिक भर दिला जाईल. शाळांमधील शैक्षणिक प्रवाह, अवांतर क्रिया आणि व्यावसायिक प्रवाह यांच्यात एकात्मता साधण्याचा प्रयत्न केला जाईल. यासाठी इयत्ता सहावी पासूनच इंटर्नशिपसह व्यावसायिक शिक्षणाची तरतूद या धोरणात केलेली आहे.

या शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षण व्यवस्थेचे संपूर्ण नूतनीकरण करून तिला गुणवत्तेची जागतिक पातळी साध्य करण्यासाठी नवीन ऊर्जा प्रदान करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. देशाच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान एक मोठे बहुशाखीय विद्यापीठ आणि महाविद्यालय असतील. अधिक बहुशाखीय पदवीपूर्व शिक्षणाच्या दिशेने वाटचाल केली जाईल. यासाठी संस्थांची पुनर्रचना आणि बळकटीकरणावर भर दिला आहे. सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमाचे मुख्य प्रवाहातील शिक्षणामध्ये एकात्मीकरण करणे याला प्राधान्य देण्यात आले आहे. उच्च शिक्षणातील पदवी प्रमाणपत्र कोर्स ३ ते ४ वर्षांच्या लवचिक अभ्यासक्रमासह एकापेक्षा अधिक एक्झिट ऑप्शन्ससह आणि वेगवेगळ्या स्तरावर प्रमाणपत्रांसह दिले जातील. ४ वर्षे एकात्मिक बी. एड. २०३० पर्यंत पदवी अभ्यासक्रम अध्यापनासाठी किमान पदवी पात्रता असेल.

उच्च शिक्षणातील मूल्यमापन पद्धती ही श्रेयांकाधारित असेल त्यासाठी उच्च शिक्षणात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचे अकॅडमी बँक ऑफ क्रेडिटचे डिजिटल आयडी (ABC ID) असेल. एम.फिल अभ्यासक्रम बंद केले जातील. १५ वर्षात महाविद्यालयांची संलग्नता प्रणाली पुसून टाकली जाईल आणि महाविद्यालयांना श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्याची यंत्रणा राबविली जाईल. भविष्यात प्रत्येक महाविद्यालयाचा स्वायत्त पदवी देणारे महाविद्यालय किंवा विद्यापीठाचा घटक म्हणून विकसित होणे अपेक्षित आहे. उच्च शिक्षण व्यवस्थेत शिक्षणाच्या आंतर राष्ट्रीयिकरणावर भर दिला जाईल. परदेशी विद्यापीठांना भारतात कार्यरत होण्यासाठी मदत केली जाईल.

नवसंशोधनाच्या कल्पना वेगाने देशभर वितरित व्हाव्यात यासाठी तसेच जिवंत अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी आणि यातून समाजाच्या उत्थानासाठी ज्ञान निर्मिती आणि संशोधनाला अनन्य साधारण महत्त्व आहे हे जाणून त्यासाठी नॅशनल रिसर्च फाउंडेशनची स्थापना करण्यात येईल. या फाउंडेशनच्या माध्यमातून दर्जेदार शैक्षणिक संशोधनाला चालना दिली जाईल. त्याचबरोबर शैक्षणिक प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर आणि एकात्मिकरण तसेच ऑनलाईन आणि डिजिटल शिक्षण यांचा वापर सुनिश्चित करणे. या सर्वांसाठी संस्थांमध्ये प्रभावी व्यवस्थापन आणि नेतृत्व याला महत्त्व देण्यात आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या फुलश्रुतीसाठी उत्कट, प्रेरित, प्रशिक्षित आणि सुसज्ज शिक्षक अतिशय महत्त्वपूर्ण आहे. शिक्षकाच्या गुणवत्तेचे हे कठीण आव्हान पेलण्यासाठी या शैक्षणिक धोरणात पुढील प्रमाणे तरतूद सुचवली आहे. शाखांनी सुसज्ज असलेल्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये स्तरानुसार व विषयवार राबवण्यात येणारा एकीकरण केलेला चार वर्षांचा बॅचलर ऑफ एज्युकेशन हा अभ्यासक्रम शिक्षकांना पूर्ण करणे गरजेचे आहे. शिक्षक होण्याचा हा प्रमुख मार्ग असेल. दुय्यम दर्जाच्या व अकार्यक्षम शिक्षक शिक्षण संस्था बंद करण्यात येतील. शिक्षकांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रम हे NCERT बरोबर सल्लामसलत करून राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) द्वारा निश्चित केले जातील. प्रेरित उत्साही आणि सक्षम शिक्षक घडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

वैद्यकीय आणि कायदेशीर शिक्षण वगळता संपूर्ण उच्च शिक्षणासाठी 'उच्च शिक्षण आयोग 'Higher Education Commission of India' (HECI) ची स्थापना केली जाईल. सार्वजनिक आणि खासगी दोन्ही उच्च शिक्षण संस्था समान निकषांद्वारे संचालित केल्या जातील.

**भारताच्या उच्च शिक्षण आयोगामध्ये (HECI) पुढील प्रमाणे चार स्वतंत्र विभाग असतील.**

१) नियामक चौकटीची देखभाल करण्यासाठी राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद (NHERC)

२) सर्वसाधारण शैक्षणिक परिषद (GEC) ही मानक सेटिंग्ज देखरेखीसाठी असेल.

३) वित्तपुरवठा करण्यासाठी उच्च शिक्षण अनुदान परिषद (HEGC) कार्यान्वित केली जाईल.

(पान २ वर)

पुढारी

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि आत्मनिर्भर भारत

(पान १ वरुन)

४) अधिकृत मान्यता मिळवण्यासाठी राष्ट्रीय मानांकन परिषद (NAC) कार्यान्वित केली जाईल.

पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण आयोग (NAC) स्थापना करण्यात येईल. हा आयोग भारतातील शैक्षणिक दूरदृष्टीचा परिरक्षक असेल.

अशा प्रकारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अनेक नवीन व कालसुसंगत गोष्टी आणण्याचा प्रयत्न झालेला आपणास दिसून येतो. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संपूर्ण आत्मनिर्भर बनविण्याचे उद्दिष्ट देशासमोर ठेऊन आत्मनिर्भर भारत मिशन, राष्ट्रीय कौशल्य विकास, मेक इन इंडिया यासारखे अनेक महत्वाकांक्षी उपक्रम सुरु केले आहेत. या सर्व उपक्रमांचा भर देशाच्या नवकल्पनांवर आणि स्टार्ट-अप इकोसिस्टमवर आहे. देशाची अर्थव्यवस्था अधिकाधिक मजबूत व टिकाऊ बनविणे या उद्दिष्टांनी प्रेरित असलेल्या या सर्व उपक्रमांना/प्रकल्पांना गती देण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० महत्वाची भूमिका बजावणार आहे. हे लक्षात घेऊनच आमच्या संस्थेने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि आत्मनिर्भर भारत मिशन यांचा परस्पर अन्वय नेमका कसा आहे हे विद्यार्थी, शिक्षक आणि शैक्षणिक व्यवस्थेशी निगडित समाज यांना समजण्यासाठी एनईपी २०२०, बौद्धिक संपदा अधिकार, नवकल्पना आणि सर्जनशीलता, उद्योजकता विकास या विषयांवर आधारित राष्ट्रीय स्तरावरील वेबिनार आयोजित करण्यात तत्परता दाखवली होती. आणि यामुळेच आमची शिक्षण संस्था ही राष्ट्रीय समस्या आणि धोरणांना त्वरित आणि सक्रिय प्रतिसाद देण्यासाठी ओळखली जाते असे मी नमूद केले तर अतिशयोक्ती होणार नाही!

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि आत्मनिर्भर भारत मिशन एकमेकांशी कसे जोडले गेले आहे हे पाहू. आपणास असे दिसते की आत्मनिर्भर भारत मिशन हे खालील प्रमाणे पाच स्तंभांवर उभे आहे.

१. क्वांटम जंप आणणारी अर्थव्यवस्था.

२. पायाभूत सुविधा-जी आधुनिक भारताची ओळख बनते.

३. २१ व्या शतकातील स्वप्ने पूर्ण करण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारित प्रणाली.

४. आमची चैतन्यशील लोकसंख्या जी उर्जेचा स्त्रोत आहे.

५. मागणी आणि पुरवठा साखळीची ताकद जी तिच्या पूर्ण क्षमतेने वापरायची आहे.

आणि हे आत्मनिर्भर भारत मिशनचे पाच आधारस्तंभ मजबूतपणे उभे करावयाचे असतील तर त्यासाठी आपल्या अर्थव्यवस्थेने निर्णायक स्थान धारण करून शिक्षण, रोजगारक्षमता, रोजगार आणि उद्योजकता यांची एक घट्ट वीण निर्माण केली पाहिजे. या सर्वांमध्ये शिक्षण व्यवस्थेचे योगदान मुलगामी ठरणार आहे.

शिक्षण हा कोणत्याही समाजाच्या वाढीचा आणि विकासाचा आरंभबिंदू असतो. शिक्षण व्यवस्था हीच देशाच्या अर्थव्यवस्थेला सर्वच पातळ्यांवरील कुशल मानवी संसाधन पुरविण्याचे काम करीत असते. देशाला आवश्यक अशी सर्वच प्रकारची टास्क फोर्स निर्माण करण्याची जबाबदारी ही देशाच्या शिक्षण व्यवस्थेवरच असते. त्यामुळे अर्थकारण आणि शिक्षण या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडल्या गेल्या पाहिजेत. शिक्षणामुळे रोजगारक्षमता निर्माण झाली पाहिजे. रोजगारक्षमतेमुळे रोजगार शक्य झाला पाहिजे आणि उद्योजकता सुलभ झाली पाहिजे. आपल्या देशात नोकरी शोधणारे आणि नियोक्ते या दोघांसाठी अनेक वर्षांपासून रोजगारक्षमता हे कठीण आव्हान राहिले आहे. आणि यातूनच भारतीय शिक्षण व्यवस्थेवर परिणामकारकता नसल्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण केले गेले. इंडस्ट्रीजना रोजगाराची पात्रता धारण केलेल्या उमेदवारांना शोधण्यासाठी झगडावे लागत आहे आणि नोकरी शोधणारे लोक नोकरी शोधत आहेत. अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली. इंडस्ट्री-अकॅडेमिया गॅप ही आपल्या देशातील गेल्या काही वर्षातील सर्वाधिक चर्चेत असलेली गोष्ट आहे!

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे इंडस्ट्री आणि अकॅडेमिया हा गॅप भरून काढू शकेल काय? या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे आहे. कारण राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची रचना उद्योगाच्या ट्रेंड आणि नमुन्यांनुसार शिक्षण देण्यासाठी केली आहे आणि यामुळेच आपल्या देशाचे भवितव्य आशादायक दिसत आहे. कारण हे NEP 2020 उदयोन्मुख कार्यबल म्हणजेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर केंद्रित आहे.

NEP 2020 हे उद्योजकतेसाठी रोडमॅप तयार करू शकते काय? या प्रश्नाचे उत्तर 'होय' असेच आहे, कारण NEP 2020 व्यावसायिक शिक्षण आणि उद्योगासह मुख्य प्रवाहातील शिक्षणाच्या एकात्मतेला प्रोत्साहन देते; हे उद्योग-शैक्षणिक संबंध, स्टार्ट-अप उष्मायन केंद्रे स्थापन करून संशोधन आणि नवकल्पना यावर केंद्रित असून व्यवसाय-केंद्रित दृष्टिकोनाला देखील प्रोत्साहन देते; उद्योजकता अभिमुख कार्यक्रम तयार करणे ज्यामुळे उद्योजकीय क्रांती होईल. माझ्या मते, NEP 2020 ने स्वावलंबी भारत मिशनच्या ६ व्या स्तंभांचा पाया घातला आहे आणि हा ६ वा स्तंभ आहे.... शिक्षण.

आत्मनिर्भर भारत मिशनसाठी आपल्या भारताच्या शिक्षण व्यवस्थेने NEP 2020 प्रमाणे शिक्षणप्रक्रिया प्रभावीपणे अंमलात आणल्यास भारत हा भविष्यात जगातील संशोधन आणि विकास यांचे एक प्रमुख गंतव्यस्थान बनेल एवढेच नव्हे तर यावरच तो भविष्यातील ज्ञानसत्ता आणि आर्थिक महासत्ता बनेल. उच्च शिक्षण संस्था सध्यस्थितीतील शिक्षण व्यवस्थेसमोरील सर्वच प्रकारच्या आव्हानाचा सामना करण्यास तयार आहेत का? याचे उत्तर जर 'होय' असे असेल तर NEP 2020 च्या प्रभावी अंमलबजावणी शिवाय दुसरा पर्याय नाही. या संदर्भात, मी आपल्याशी आमच्या संस्थेने घेतलेले NEP 2020 शी संबंधित काही विशिष्ट उपक्रम सामायिक करू इच्छितो. आमची संस्था ही महाराष्ट्रातील एकमेव संस्था आहे. जिने ज्ञानाच्या निर्मितीसाठी स्वत:ची परिसंस्था निर्माण केली आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार, GST कायदा यांसारख्या उदयोन्मुख व्यवसायांशी संबंधित स्वयं-डिझाइन केलेले व्यावसायिक कौशल्य विकास अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना देऊ करून उद्योजकता आणि रोजगारक्षमता निर्मितीचा महत्त्वपूर्ण प्रयत्न केला आहे, करत आहे! आम्ही सातारा आणि पुणे जिल्ह्यातील आघाडीच्या इंडस्ट्रीजसोबत २९ सामंजस्य करार (MOU) अंमलात आणले आहेत जे आमच्या विद्यार्थ्यांना प्रायोगिक शिक्षण, नोकरीसाठी प्रशिक्षण आणि इंटर्नशिपद्वारे शिकाऊ-केंद्रित शिक्षण देण्यासाठी कार्यरत आहेत; अशा प्रकारे, उच्च क्षमतेचे कुशल मानव संसाधन विकसित करण्यासाठी विद्यार्थी आणि प्राध्यापकांमध्ये व्यावसायिक कौशल्ये विकसित करणे; जी आपल्या अर्थव्यवस्थेची, समाजाची आणि संपूर्ण देशाची गरज आहे. त्यासाठी आम्ही गेल्या तीन वर्षांपासून याची अंमलबजावणी करत आहोत!

प्रिय मित्रांनो, एक्सप्लोर करा, नाविन्याचा शोध घ्या, संशोधन करा आणि एक्सेल हे आमचे संस्थात्मक बोधवाक्य आहे; आणि मला खात्री आहे की आमची संस्था यामध्ये पुढे जाईल. रोजगारक्षमता, उद्योजकता आणि शेवटी आत्मनिर्भर भारताशी निगडित NEP 2020 च्या घटकांचा शोध घेण्यावर लक्ष केंद्रित करून प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या संभाव्य, प्रामाणिक आणि समर्पित प्रयत्नांसह सातत्यपूर्ण निरंतर वाटचाल करणे हाच भारताच्या उज्वल भविष्याचा राजमार्ग आहे आणि आमची या मार्गावर अखंड वाटचाल सुरू आहे. NEP 2020 च्या इप्सित, ध्येय-धोरण, उद्दिष्टांपर्यंत पोहचण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील सर्वच घटकांनी आपापल्या कम्फर्ट झोनमधूनबाहेर पडून सकारात्मक दृष्टीने आपापले योगदान देणे अपेक्षित आहे. अन्यथा इंग्रजी भाषेतील Old wine in new bottle या म्हणीप्रमाणे NEP 2020 हा केवळ एक उपचार बनून राहील.